# कविभूषण शाहीर प्रल्हादराय जन्मशताब्दी

'पोवाड्यांची ग्रांथिक जन्मशताब्दी' हा श्री. अविनाश सहस्रबुद्धे यांचा माहितीपूर्ण लेख २७ फेब्रुवारी ई.च्या रविवार महाराष्ट्र टाइम्स मध्ये प्रसिद्ध झाला. पोवाड्यांबद्दल उद्बोधक व महत्त्वाची माहिती हलीच्या पिढीस मिळाली. काही मौलिक मुद्दे या लेखात मांडले आहेत.

## पोवाडे बहुजन समाजाचे वाङ्मय

शाहिरी काव्याला मराठी कवितेचा उषःकाल म्हटले जाते. सर्वधर्मसमभावाचे तत्त्व पोवाडे वाङ्मयात प्रकर्षाने पाळले गेले महाराष्ट्राचे पहिले निधर्मी वाङ्मय असेही त्याचे वर्णन करण्यात येते. मराठेशाहीत किंवा पेशवाईतच नव्हे तर स्वातंत्र्यपूर्व कालातही सर्व थरातील शाहिरांनी या वाङ्मय निर्मितीस हातभार लावला ~~आहे~~ ही उल्लेखनीय बाब आहे.

स्वातंत्र्यपूर्व कालात अशा प्रतिभाशाली शाहिरांची मालिका तयार झाली. त्यामध्ये जळगावच्या कविभूषण महाराष्ट्र शाहीर प्रल्हादराय जामखेडकर यांच्या नावाचा अवश्य उल्लेख करावा लागेल. शाहीर प्रल्हादराय यांनी विपुल पोवाडे लेखन व गायन करून शाहिरी वाङ्मयात मोलाची भर घातली. विशेष म्हणजे प्रल्हादरायांचा जन्म ही इ.स. १९१२ च्या मे महिन्यात झाला. अशी योगायोगाने ह्या वर्षी पोवाड्यांची ग्रांथिक शताब्दी व शाहीर प्रल्हादरायांची जन्म शताब्दी साजरी होत आहे.

## नाशिकमध्ये बालपण व बालकाव्य

नाशिक जवळील गिरणारे येथे दिनांक ६ मे १९१२ रोजी प्रल्हादरायांचा जन्म झाला. त्यांचे शालेय शिक्षण नाशिक येथे झाले.

लहानपणापासूनच त्यांना ऐतिहासिक वाचनाची गोडी लागली. त्यावेळच्या क्रांतिकारी विचारांनी ते भारावून गेले. इंग्रजी अमदानीत अभिव्यक्तीवर अनेक बंधने असतानाही त्यावेळच्या नेत्यांनी स्वातंत्र्यप्राप्तीसाठी अनेक माध्यमांचा जनजागृतीसाठी प्रभावीपणे वापर केला. त्यातले एक प्रमुख माध्यम म्हणजे 'मेळा'. राष्ट्रीय मेळे गणेशोत्सव व इतर प्रसंगी देशभक्तिपर गीते, संवाद, पोवाडे सादर करीत. मेळ्यांनी राष्ट्रजागृतीचे केलेले काम आज जवळ जवळ विस्मृतीत गेले आहे. 'मित्र मेळा' नाशिकचे भूषण होता. त्यात प्रल्हादराय दाखल झाले, व रमले. मित्र मेळ्यावर बंदी आल्यावर कै. प्रल्हाद रंगनाथ जामखेडकर यांनी १९२८ साली 'लोकमान्य' मेळा स्थापन केला. लगेचच लोकमान्य मेळा अत्यंत लोकप्रिय झाला. गावात इतर मेळे होते तरी कलादृष्ट्या लोकमान्य मेळ्याची बरोबरी फार थोडे मेळे करू शकत. देशभक्तीची व शाहिरी कलेची प्रेरणा प्रल्हादरायांनी येथेच घेतली. स्वातंत्र्यवीर सावरकर, कवि गोविंद इत्यादी प्रतिभाशाली स्वातंत्र्यशाहिरांचा त्यांच्यावर प्रभाव पडला.

## शाहिरी संच

सुरवातीस काही काळ त्यांनी सरकारी नोकरी केली. पण लवकर नोकरीचे जू झुगारून त्यांनी स्वतंत्र व्यवसायास प्रारंभ केला. कॉमनवेल्थ विमा कंपनीचे खानदेश, सी.पी., वऱ्हाड या भागाचे चीफ एजंट म्हणून ते काम करू लागले. इ.स. १९२७ पासून एक शाहिरी संच जमवून डफावर कणखर थाप मारून शाहिरी पेशाचाही श्रीगणेशा घातला.

प्रत्येक वर्षी स्वतःचे नवीन पोवाडे रचून, स्वतःच नव्या चाली लावून ते सादर करण्याचे व्रत घेऊन शेवटपर्यंत अंमलात आणले. शाहीर या शब्दात कोणत्या क्रियांचा अंतर्भाव होतो. अशा 'शाहीर' व्याख्येत प्रल्हादरायांचा समर्पकपणे समावेश होतो.

संशोधन व संवर्धनावर भर

पोवाडयांच्या दोन मुख्य अंगांवर प्रल्हादरावांनी भर दिला. पोवाड्यांची रचना सरळ, सुबोध, अलंकारपूर्ण व शैलीदार असावी म्हणून ते मेहनत घेत. कुठलाही ऐतिहासिक पोवाडा लिहिण्यापूर्वी त्याविषयावरची सर्व माहिती एकत्र करीत, उपलब्ध साधनांचा अभ्यास करीत व नव्या माहितीवर आधारित पोवाडे लिहित. याचे उदाहरण म्हणजे त्यांचा 'बापू गोखल्यांचा पोवाडा'. त्यात इंग्रजांचे असत्य उघडकीस आणले असता त्यावेळच्या सरकारने त्यांना पोवाडा जप्त का करू नये म्हणून नोटीस दिली होती. त्या आधीच त्यांचा "बौद्ध महात्मा" हा पोवाडा जप्त झालेला होता. 'नवीन ऐतिहासिक माहितीनुसार हा पोवाडा लिहिला आहे. हे संशोधन चुकीचे आहे हे सिद्ध केल्यास बापू गोखल्यांचा पोवाडा जप्त करू शकता' असे निर्भिड उत्तर त्यांनी दिले. अजून पर्यंत त्यास उत्तर नाही!

दुसरे अंग चालींचे! जुन्या परंपरागत चालींचा अभ्यास करून ते थांबले नाहीत पण त्यातही संशोधन करून नवीन चाली लावून लोकप्रिय केल्या. शंभरावर चालींचे नोटेशन केले. सूर-ताल यांचे अंग शाहीराला असलेच पाहिजे यावर त्यांचा कटाक्ष होता. नारायणराव पेशव्यांच्या वधाचा जुना पोवाडा संशोधित करून बसविला.

डफ तुणतुण्याबरोबर तबला पेटी

पारंपारिक वाद्यांबरोबरच आधुनिक कालाशी सुसंगत अशा तबला-पेटीची साथ घेण्यात ते अग्रेसर होते. तसेच डफाच्या व तुणतुण्याच्या रचनेतही त्यांनी फेरफार करून सुधारणा केल्या. त्यांना गाण्याचे (संगीत) अंग असल्याने, सुरेलपणा चालींची विविधता, स्पष्ट शब्दोच्चार, व अचूक ताल हे गुण त्यांच्या गायनात आढळत. तसेच पोवाड्या आधी त्या घटनेची माहिती श्रोत्यांना सांगत, त्यामुळे पोवाडे अधिक रंगत. महाराष्ट्रभर व महाराष्ट्राबाहेरही त्यांनी असंख्य कार्यक्रम सादर केले.

विपुल रचना

प्रल्हादरावांनी विपुल रचना केली. त्यापैकी २८ पोवाडे व शाहिरी कवने त्यांनी प्रकाशित केली. 'इतर वाङ्मय प्रकाशनाच्या मार्गावर आहे. विशेष म्हणजे झांसी, इटारसी, रतलाम, इंदूर, देवास वगैरे हिंदी भागांसाठी त्यांनी हिंदीतूनही पोवाडे लिहिले होते. ओडियन व यंग इंडिया ग्रामोफोन कंपन्यांनी त्यांच्या पोवाड्यांच्या ध्वनिमुद्रिका काढल्या होत्या. रेडिओवरही त्यांनी कार्यक्रम दिले.

त्यांना अनेक गौरव प्राप्त झाले. महत्त्वाचा गौरव म्हणजे शंकराचार्यांनी दिलेली 'कविभूषण' ही पदवी.

अशा प्रतिभासंपन्न शाहिराच्या जन्मशताब्दी वर्षात काही खास कार्यक्रम आयोजित करण्यात आहे. या लेखाद्वारे त्यांचे पुण्यस्मरण करून त्यांच्या प्रतिभेस अभिवादन!

—→—

पं. अरविंद मुळगावकर
१७ वी लतीफाबाद
गोरबाई वाडिया रोड,
परळ, मुंबई ४०० ०१२